N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** Sambhaji Nagar

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0256 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/12/2022 04:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 26/12/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/12/2022
   **Time From (वेळेपासून):** 13:25 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/12/2022 **Time (वेळ):** 02:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/12/2022 02:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अंबाजोगाई बायपास रोडवर ,कन्हेरवाडी शिवार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बाबु भिमराव फड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कन्हेरवाडी तापरळी जिबीड ,Sambhaji Nagar,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कन्हेरवाडी तापरळी जिबीड ,Sambhaji Nagar,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921083888

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल रामदास वाघ | | | 1. बन, तासेनगाव जिहिंगोली ,हमु टीपीएसकलनी इमारत क्र23, परळी वै,Sambhaji Nagar, बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | आदीनाथ आश्रुबा खाडे | | | 1. पिंपळारुई तावडवणी , शिवाजीनगर, परळी जिबीड , Sambhaji Nagar,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 80000/ | 80,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

80,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय, बीड
दिनांक 26/12/2022
मी बाबु भिमराव फड, वय-37 वर्षे, व्यवसाय-राख वितरक, रा.कन्हेरवाडी ता.परळी जि.बीड मो.9922342923, मो.9921083888
मी दिनांक 22/12/2022 रोजी परळी येथे सुरक्षीत ठिकाणी श्री.रविंद्र परदेशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचेसमक्ष तक्रार दिली की, " मी औष्णीक विद्युत केंद्र परळी येथील राख वितरक म्हणुन कामकाज करतो. प्रो.प्रा.मे.आर्या सिमेंट पाईप ऍण्ड प्रोडक्टस, बिगवण यांनी औष्णिक विद्युत केंद्र, परळी येथील ऍश युनिट नंबर 6, 7 व 8 मधुन फ्लाय ऍश उचलण्यासाठी, रोड युजर चार्जेस भरणे, गेटपास घेणे, गाडयाचे नंबर लावणे, गाड्या आत सोडणे, टॅक्स इन्व्हाईस घेणे इत्यादी कामासाठी मला व ईतर दोघाना अधिकार पत्र (ऑथरेटी) दिलेले आहे. सदर फर्मच्या वतीने मी ऍशसेल चार्जेस औष्णिक विद्युत केंद्र, परळी येथे भरणा केले असुन मला एकुण वीस गेटपास मिळणे आवश्यक आहे. गेटपास घेण्यासाठी मी श्री.वाघ, उप कार्यकारी अभियता, राख हाताळणी विभाग प्रमुख, औष्णिक विद्युत केंद्र, परळी यांची भेट घेतली असता, ते प्रत्येक गेटपाससाठी 5000/-रु. प्रमाणे विस गेटपासचे एकुण 1,00,000/-रुपयाची मागणी करत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 22/12/2022 रोजी श्री.रविंद्र परदेशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांनी श्री.अनिल वाघ, उप कार्यकारी अभियंता, औष्णीक विद्युत केंद्र, परळी हे माझ्याकडे माझे काम करुन देण्यासाठी पैशाची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्रमांक -1 श्री.जायभाये यांना श्री.वाघ यांचेकडे औष्णीक विद्युत केंद्र, परळीचे कार्यालय येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/परदेशी यांनी मला व पंचांना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक-1 श्री.जायभाये यांना औष्णीक विद्युत केंद्र, परळीचे कार्यालय येथे श्री.वाघ यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, लाच मागणी पडताळणी दरम्यान माझी व श्री.वाघ यांची भेट झाली. त्या दरम्यान माझेत व श्री.वाघ यांचेत माझे गेटपास संदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्री.वाघ यांनी राख वाहतुक करण्याकरीता गेटपास देण्यासाठी प्रत्येक गेटपाससाठी 5000/-रु. प्रमाणे मागणी करुन तडजोडअंती प्रत्येक गेटपाससाठी 4000/-रु. प्रमाणे असे एकुण वीस गेटपासचे 80000/-रुपये स्विकारण्याचे मान्य केले. मी पोनि/परदेशी यांना कळवले की, श्री.वाघ यांनी मला लाच रक्कम 80000/-रु. श्री.खाडे तसेच माझा भाऊ मारोती, अक्षय किंवा अंगद यांचेकडे देण्यास सांगीतले आहे. परंतु मी श्री. वाघ यांना पैसे तुम्हालाच देतो असे म्हणुन दोन वाजता येतो असे सांगीतले आहे त्यामुळे पैसे देण्याची कारवाई श्री. वाघ यांचेवर करावी. त्यावरुन श्री.वाघ यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. पोनि/परदेशी यांनी वेळे अभावी स्वतंत्र पंचनामे करणे शक्य नसल्याने एकत्रीत पंचनामा करण्याचे सांगीतले. त्यानंतर परळी येथे सुरक्षित ठिकाणी दोन शासकीय पंचांसमक्ष पोनि/परदेशी यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 80,000 /-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात

ठेवुन मला लाच स्वीकृती नंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. त्यादरम्यान श्री.वाघ यांनी मला त्यांचे मोबाईल वरुन माझे मोबाईलवर फोन करुन भेटण्यासाठी थर्मल कॉलनी गेट, परळी येथे बोलावले. त्यावरुन मला व पंच क्रमांक -1 श्री.जायभाये यांना श्री.वाघ यांची भेट घेण्यासाठी थर्मल कॉलनी परळी येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्रमांक -2 येते होते. मी व पंच क्रमांक -1 श्री.जायभाये असे थर्मल कॉलनी गेट परळी येथे गेलो. मी माझा मोबाईलवरुन श्री.वाघ यांना फोन करुन कॉलनी गेटला थांबलो असल्याचे सांगीतले असता, त्यांनी थांब येतो असे सांगीतले. त्यानंतर पुन्हा माझे व श्री.वाघ यांचे मोबाईल फोनवर संभाषण झाले. त्यावेळी श्री.वाघ यांनी मला अंगदकडे जाऊन पैसे दे असे म्हणाले असता, मी त्यांना अंगदकडे पैसे देणार नाही असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने श्री.वाघ हे कॉलनी गेटला आले. त्यावेळी आमचेत चर्चा होऊन श्री.वाघ यांनी मला कॉलनीत चल असे सांगीतल्याने आम्ही त्यांचे मोटार सायकलचे पाठोपाठ कॉलनी मध्ये जाऊन परत कॉलनी गेटकडे येत असताना श्री. वाघ यांनी मला फोन करुन माझा भाऊ मारोती कॉलनी गेटला कशाला आला, पैसे मारोतीकडे देऊन टाक, मी बघतो नंतर काय करायचं ते असे म्हणुन श्री.वाघ हे त्यांचे मोटार सायकलने निघुन गेले. त्यानंतर मी सापळा पथकास परत जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मी व पंच क्रमांक-1 सुरक्षीत ठिकाणी परत आलो.
त्यानंतर पोनि/परदेशी यांना मी औष्णीक विद्युत केंद्र परळीचे कार्यालयात जाऊन श्री.वाघ यांना भेटुन पैसे देण्यासाठी पाठवावे अशी विनंती केली. त्यावरुन पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक -1 श्री.जायभाये यांना औष्णीक विद्युत केंद्र, परळीचे कार्यालयकडे रवाना केले. मी व पंच क्रमांक-1 असे औष्णीक विद्युत केंद्र, परळीचे कार्यालयात गेलो. त्याठिकाणी श्री.वाघ यांची भेट झाली नाही. त्यामुळेकार्यालयातील कर्मचारी यांना श्री.वाघ यांचेबाबत माहिती घेतली असता, श्री.वाघ हे मिटींगला गेले असल्याचे सांगुन सकाळी गेटपास देतो असे सांगीतले. त्यानंतर मी सापळा पथकास परत जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मी व पंच क्रमांक-1 सुरक्षीत ठिकाणी परत आलो. त्यावरुन श्री.वाघ यांचेविरुध्द दिनांक 23/12/2022 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत दिनांक 22/12/2022 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई स्थगिती पंचनामा केला.
दिनांक 23/12/2022 रोजी श्री.वाघ यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, माझी व श्री.वाघ यांचेत मोबाईल फोनवर माझे कामासंदर्भाने चर्चा सुरु असताना श्री.वाघ यांनी फोन बंद केला. त्यानंतर श्री.वाघ यांनी माझा फोन उचलला नाही. त्यावरुन श्री.वाघ यांचेविरुध्द दिनांक 24/12/2022 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत दिनांक 23/12/2022 रोजी सापळा कारवाई स्थगिती पंचनामा केला.
दिनांक 24/12/2022 रोजी श्री.वाघ यांचेविरुध्द औष्णीक विद्युत केंद्र, परळीचे कार्यालय येथे लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, त्याठिकाणी श्री.वाघ यांची भेट झाली नाही. त्यामुळेकार्यालयातील कर्मचारी यांना श्री.वाघ यांचेबाबत माहिती घेतली असता, कार्यालयातील कर्मचारी यांनी श्री.वाघ यांची परिक्षा असल्याने ते कार्यालयात आले नसुन त्यांचेशी संपर्क केला असता, त्यांनी सारखं फोन करु नका, मी ज्यावेळेस फोन लावेल किंवा मॅडमला मॅसेज टाकेल त्यावेळेस गेटपास द्या असे सांगीतले. त्यानंतर मी सापळा पथकास परत जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मी व पंच क्रमांक-1 सुरक्षीत ठिकाणी परत आलो. त्यानंतर खाजगी व्यक्ती श्री.खाडे यांचे फोनवर श्री.वाघ यांनी मला फोन करुन माझ्या कामासंदर्भाने चर्चा करुन श्री.खाडे यांची भेट घेण्यास सांगीतले. त्यानंतर खाजगी ईसम श्री.खाडे यांनी मला कळवले की, श्री.वाघ यांनी पैसे माझ्याकडे द्यायचे सांगीतले आहेत. त्यानंतर मी पोनि/परदेशी यांना कळवले की, श्री.वाघ व श्री.खाडे यांचेविरुध्द उद्दईक रोजी लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करावे. त्यावरुन सापळा कारवाई स्थगित करुन दिनांक 25/12/2022 रोजी श्री.वाघ व श्री.खाडे यांचे विरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत दिनांक 24/12/2022 रोजी सापळा कारवाई स्थगिती पंचनामा केला
दिनांक 25/12/2022 रोजी श्री.वाघ व श्री.खाडे यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, माझी व श्री.वाघ यांचेत मोबाईल फोनवर माझे कामासंदर्भाने चर्चा होऊन श्री.वाघ यांनी भेटतो तुला संध्याकाळी स्वत:हुन फोन करतो परत फोन लावु नको असे सांगुन श्री.वाघ यांनी फोन बंद केला. त्यानंतर श्री.वाघ यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 श्री.जायभाये यांना श्री.वाघ यांचे राहते घरी पाठवुन लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, माझी व श्री.वाघ यांची भेट झाली नाही. त्यावरुन मी श्री.वाघ व श्री..खाडे यांचेविरुध्द दिनांक 26/12/2022 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करावे अशी विनंती केली. त्यावरुन श्री. वाघ व श्री.खाडे यांचेविरुध्द दिनांक 26/12/2022 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत दिनांक 25/12/2022 रोजी सापळा कारवाई स्थगिती पंचनामा केला.
दिनांक 26/12/2022 रोजी पोनि/परदेशी यांनी सापळा पुर्व कारवाई पंचनामा दरम्यान दिलेल्या सुचनांची उजळणी करुन देऊन लाच रक्कम 80000/-रु. माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेऊन व्हाईस रेकॉर्डर चालु

करुन मला खाजगी ईसम श्री.खाडे यांना फोन करण्यास सांगीतल्याने श्री.खाडे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी मला परळी अंबाजोगाई बायपास रोड, कन्हेरवाडी शिवारात येण्याचे सांगीतले. त्यावरुन पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्र.1 श्री.जायभाये यांना श्री.खाडे यांची भेट घेऊन लाच रक्कम देण्यासाठी परळी अंबाजोगाई बायपास रोड, कन्हेरवाडी शिवार येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 श्री.क्षीरसागर हे येत होते. मी व पंच क्र.1 श्री.जायभाये असे दोघेही परळी अंबाजोगाई बायपास रोड, कन्हेरवाडी शिवार येथे गेलो त्याठिकाणी माझी व श्री.खाडे यांची भेट झाली भेटी दरम्यान माझेत व श्री.खाडे यांचेत माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 80,000/- रुपये बाहेर काढुन श्री.खाडे यांचेसमोर धरले असता, श्री.खाडे यांनी लाच रक्कम 80,000/-रु. उजवे हाताने स्वीकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांनी परिधान केलेल्या पँटच्या समोरच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मला लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा 13.25 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/परदेशी व सापळा पथक घटनास्थळी हजर आले. पोनि/परदेशी यांनी व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला. पोनि/परदेशी यांनी श्री.खाडे यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/परदेशी यांनी पंच क्र.1 श्री.खाडे यांना पंच क्र.2 श्री.क्षीरसागर यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.जायभाये यांनी सांगितले की, तक्रारदार यांना श्री. खाडे यांनी पैशाची मागणी करुन 80,000/-रु. लाच रक्कम स्विकारुन त्यांनी परिधान केलेल्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे असा खुलासा केला. पोनि/परदेशी यांनी खाजगी ईसम श्री.खाडे यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव आदीनाथ आश्रुबा खाडे, वय-36 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.पिंपळारुई ता.वडवणी जि. बीड ह.मु.शिवाजीनगर, परळी जि.बीड असे सांगीतले. श्री.खाडे यांनी पोनि/परदेशी यांना कळवले की, मला श्री.वाघ यांनी तक्रारदार यांचेकडुन पैसे घेण्याचे सांगीतलेवरुन मी पैसे घेतले आहेत. व श्री.वाघ हे सध्या त्यांचे घरी आहेत त्यांचेकडे चला असे सांगीतले. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक-1 व खाजगी ईसम श्री. खाडे यांना श्री.वाघ यांचेकडे रवाना केले. मी, पंच क्रमांक-1 व खाजगी ईसम श्री.खाडे असे श्री.वाघ यांचे घरी गेलो त्याठिकाणी श्री.वाघ यांचेशी भेट झाली व माझे कामाबाबत चर्चा झाली. खाजगी ईसम श्री.खाडे यांनी श्री.वाघ यांना मी पैसे दिल्याचे सांगीतले त्यावळी श्री.वाघ यांनी बाहेर चला इकडे कशाला आले, ऑफीसला चला असे सांगीतले. त्यानंतर मी, पंच क्रमांक-1 ब श्री.खाडे व श्री.वाघ असे त्यांचे घराचे बाहेर आलो त्यावेळी मी सापळा पथकास इशारा केला. सापळा पथक आमचेकडे येत असताना श्री.वाघ यांना आमचे विषयी काहीतरी संशय आल्याने .वाघ पळु लागले. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी श्री.वाघ यांचा पाठलाग करुन त्यांना पकडले. श्री.वाघ हे पळत असताना त्यांचे उजवे पायास जखम झाली. पोनि/परदेशी यांनी श्री.वाघ यांना त्यांचा, पंचांचा व सापळा पथकातील सदस्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर श्री.वाघ यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अनिल रामदास वाघ, वय-36 वर्ष, व्यवसाय नोकरी, उप कार्यकारी अभियंता, औष्णीक विद्युत केंद्र परळी रा.बन, ता. सेनगाव जि.हिंगोली ह.मु. टी.पी.एस.कॉलनी इमारत क्रमांक डी-23 परळी ता.परळी जि.बीड (वर्ग-2) असे सांगीतले.

त्यानंतर पोनि/परदेशी यांनी श्री.खाडे यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता श्री.खाडे यांनी 80000/-रु. लाच रक्कम त्यांनी परिधान केलेल्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन उजवे हाताने बाहेर काढुन पोनि/परदेशी यांचे समोर धरली असता, पोनि/परदेशी यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री.क्षीरसागर यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्रमांक 2 यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/परदेशी यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतल्या. पोनि/परदेशी यांनी पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे करण्यात येईल असे कळवले. त्यानंतर पोनि/परदेशी , सापळा पथकातील सदस्य, पंच व श्री.वाघ व श्री.खाडे असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने व मी माझेकडील वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे हजर आलोत. तसा दिनांक 26/12/2022 रोजी सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला.

तरी दिनांक 22/12/2022 रोजी श्री.अनिल रामदास वाघ, वय-36 वर्ष, व्यवसाय नोकरी, उप कार्यकारी अभियंता, औष्णीक विद्युत केंद्र परळी यांनी तक्रारदार श्री.बाबु भिमराव फड यांचेकडे त्यांचे राख वितरीत करण्याकरीता गेटपास देण्यासाठी प्रत्येक गेटपाससाठी 5000/-रु. प्रमाणे मागणी करुन तडजोडअंती प्रत्येक गेटपाससाठी 4000/-रु. प्रमाणे असे एकुण वीस गेटपासचे 80000/-रुपये स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 26/12/2022 रोजी परळी अंबाजोगाई बायपास रोडलगत कन्हेरवाडी शिवारात 13.25 वा. लाच रक्कम 80000/-रु. श्री.आदिनाथ खाडे यांचे मार्फतीने स्विकारले असता, श्री.वाघ व श्री.खाडे यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले. म्हणुन माझी श्री.वाघ व श्री.खाडे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन, वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

(रविंद्र परदेशी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURESH SUDHAKARRAO CHATE(I (Inspector)) / pobn72849

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in Charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SURESH SUDHAKAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pobn72849